# ठाणे महानगरपालिका ठाणे

## जाहिर नोटीस व आवाहन
## (डोंगर उतारावरील झोपडीधारकांसाठी)

मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील डोगर उतारातील कच्च्या व पक्क्या बांधकामामधील सर्व रहिवाशांना या जाहिर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की.

ठाणे महानगरपालिकेच्या मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील डोंगर उतारावरील काही घरे अतिवृष्टीमुळे वाहुन जाण्याची घटना मागील काही वर्षात सातत्याने घडत आहे. तसेच अतिवृष्टीच्या काळात डोंगर उतारावरील माती खचुन डोंगर उतारावरील मोठे दगड घसरल्याने जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता लक्षात घेता डोंगर उतारावरील रहिवाशांची जीवीत व वित्त हानी टाळण्याकरिता पावसाळ्यापुर्वी घरे खाली करणे अपरीहार्य झालेले आहे. त्यानुसार झोपडपट्टीधारकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 268 (1)(2)(3) अन्वये तात्काळ निवासी / अनिवासी वापराचा भोगवटा सोडण्याबाबत प्रत्येक झोपडीधारकाला प्रत्यक्ष नोटीस बजाविणे वेळेअभावी शक्य नसल्याने या नोटीसीद्वारे सर्व झोपडपट्टीधारकांना अशा ठिकाणी वास्तव्य न करणेबाबत जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील राणानगर, पंजाबी कॉलनी, वागरी कॉलनी, गौतम नगर, हनुमान नगर, दत्त चौक, दत्तावाडी परिसर, कैलास गिरी नगर व बायपास, शैलेश नगर, बंजारा वस्ती सेवालाल नगर, ठाकुरपाडा, सम्राट नगर, गावदेवी मंदिर परिसर, श्री. स्वांमी समर्थ चाळ, सिध्दार्थ नगर, आंबेडकर नगर, आझाद नगर, शिवाजी नगर, भय्या वाडी, खडीमशीन रोड व गरिब नवाज शाळा (प्रभाग क्र. 26, 30, 31 व 32 या प्रभागातील सर्व डोंगर उतारावरील वस्ती व खाडी किना-यावरील वस्ती) या परिसरातील तसेच इतर डोंगर उतारावरील झोपडीधारकांना असे आवाहन करण्यात येते की, आपण रहात असलेल्या झोपड्या ह्या डोंगर उतारावर असल्याने पावसाळ्यात मोठी पर्जन्यवृष्टी होऊन दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव आपण रहात असलेल्या झोपड्याचा वापर तात्काळ बंद करुन इतरत्र सुरक्षित निवासाचा पर्याय शोधावा.

मुंब्रा बायपास रोडच्या पश्चिमेस (डोंगराकडील भागात पर्जन्य काळात डोंगरावरुन नैसर्गिक पाण्याचा प्रवाह निर्माण होऊन ठिक-ठिकाणी धबधबे तयार होतात व अशा ठिकाणी लोकाची गर्दी होत असल्यामुळे सावधानतेचा इशारा म्हणुन नागरिकांना अशा ठिकाणी न जाणेबाबत आवाहन करण्यात येत आहे. तसेच मुंब्रा बायपासच्या डोंगर उताराच्या भागात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक प्रवाह वाहुन नेण्याच्या मार्गावर अनधिकृतरीत्या मातीची भरणी करुन नैसर्गिक प्रवाह बदलल्यामुळे सदर वस्त्यामध्ये अतिवृष्टीच्या काळात पुरसदृष्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने अशा भागात रहिवाशांनी कोणत्याही प्रकारचा भोगवटा न करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

या जाहिर नोटीसीप्रमाणे वरील सर्व नागरीकांनी त्वरीत अमलबजावणी करुन आपापल्या जागा खाली करुन महापालिकेला सहकार्य करावे. सदर आवाहनाची दखल न घेता जर का कोणीही जागेचा भोगवटा / वापर चालु ठेवल्यास त्यासंबंधी होण्या-या कुठल्याही प्रकारच्या नुकसानीस अथवा हानीस ठाणे महानगरपालिका कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

सहाय्यक आयुक्त
मुंब्रा प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned by CamScanner

मुंब्रा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे,
जा.क्र.ठामपा/मुंप्रसका/सहाआ
दि. 07-06-2019

प्रति,
मा.माहिती व जनसंपर्क अधिकारी,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**विषय :- मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील डोंगर उतारावरील कच्च्या व पक्क्या बांधकामामधील निवासी/अनिवासी भोगवटादारांनी तात्काळ भोगावटा सोडणेबाबत जाहिर नोटीस व आवाहन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.**

ठाणे महानगरपालिकेच्या मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील डोंगर उतारावरील कच्च्या व पक्क्या बांधकामामधील निवासी/अनिवासी भोगवटादारांनी तात्काळ भोगावटा सोडणेबाबत जाहिर नोटीस व आवाहन तयार करण्यात आले आहे.

सदर आवाहनाची प्रत व पेन ड्राइव्ह सोबत पाठविण्यात येत असुन स्थानिक मराठी, हिंदी व उर्दु वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

सहाय्यक आयुक्त
मुंब्रा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रत :-

1. मा. अतिरिक्त आयुक्त – 2, यांज कडे माहितीस्तव सादर,
2. मा. उपआयुक्त अतिक्रमण विभाग(मु.),
3. मा. उपआयुक्त परि-01,

Scanned by CamScanner